ISSN 2278-8808
SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# माध्यमिक स्तरावारील संस्कृतविषयाच्या अध्यापनात नाट्यीकरणाची उपयुक्तता

**Kasturi Gujar** *(Page 137-139)*
*Pune*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

साहित्य सङ्गीतकलाविहीनः साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः ।
तृणं न खादन्नपि जीवमानस्तद्भागधेयं परमं पषूणाम् ॥

साहित्य संगीत कला विरहित असा मनुष्य साक्षात शिंग व शेपूट नसलेला पशुच आहे. आणि हे पशुंचे भाग्याच कि तो गावात खात नाही.

**प्रस्तावना -**

आपली भारतीय संस्कृती म्हणजे कलेचा एक सुंदर मिलाप आहे. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असल्याने त्याला संवादांची गरज भासली व भाषेचा जन्म झाला. हिच भाषा पुढे अत्माविष्काराचे, अभीव्यक्तीचे साधन झाली. भाषा शब्दबद्ध करणे नियमबद्ध करणे व शिकणे हे सुरु झाले. यातूनच अध्ययन व अध्यापन ही कला निर्माण झाली. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी अंतरक्रिया घडू लागली. शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या नवनिर्मिती व सृजनातेला वाव मिळत गेला. अनेक कलांची जसेकी नाटक, नृत्य, वादन यांचीही निर्मिती झाली.

भरतमुनींच्या ‘नाट्यशास्त्र’ या ग्रंथात नाटकाविषयी सर्वांगीण विवेचन कलेले आढळते. नाटकाच्या सुरुवातीला ‘नांदी’ असते व नाटकाच्या शेवटी ‘भरतवाक्य’ असते. नाटकात नवरस असतात.

‘शृंगारवीरकरुणाद्भुतहास्यभायानाकाः।

 ISSN 2278-8808, SJIF 5.403

बिभत्सरौद्रौ शान्तश्च काव्ये नवरसाः मताःll'

नाटकाची सुरवात, मध्य व शेवट हा मंगलमय असावा यासाठी

'मंगलदिनि मंगलमध्यानि मंगलान्तानि l' अशी वचने आढळतात.

नाट्यीकरणातून जर का अध्ययन व अध्यापन केले तर त्याचा विद्यार्थ्यांवर प्रभाव हा दीर्घकाळ टिकणारा असेल.

'एकंदरीत केवळ माहिती किंवा ज्ञान देणे हा शिक्षणाचा किंवा अध्यापनाचा मूळ उद्देश नसून विद्यार्थ्यांच्या मनःशक्तीचा व प्रवृत्तींचा विकास करणे होय.' या संदर्भातच लिव्हिंगस्टन म्हणतात कि 'Genius is one percent inspiration and ten percent perspiration.' अध्यापन हि एक कला आहे. संस्कृत हि अवघड वाटणारी भाषा सोपी ओघवती होईल व सर्वच स्तरातील विद्यार्थ्यांचा या भाषेकडे काळ वाढेल.

**नाट्यीकरणासाठी उपयुक्त घटक (पाठ)**

८ वी संयुक्त व संपूर्ण या दोनही पाठ्यपुस्तकात द्वितीयः पाठः – शिबिरस्य प्रारम्भःl

८ वी संपूर्ण – अष्टमः पाठः – स्वच्छता अभियानम् l

एकादशः पाठः – अभेदः कुटीर प्रासाद्योः l

९ वी संपूर्ण – तृतीयः पाठः – अवकरः सुवर्णसमः l

९ वी संयुक्त – चतुर्थः पाठः – वृक्षासौहार्दम् l

१० वी संयुक्त - द्वितीयः पाठः – ग्राहकहिताय ग्राहकसुखाय l

पंचमः पाठः – अवैधाचारः नैव करणीयः l

१० वी संपूर्ण – द्वितीयः पाठः – उर्जासंचयः एव धनसंचयः l

षष्ठः पाठः – रसस्वादनम् l

**नाट्यीकरणातून केलेल्या अध्यापनाचे फायदे**

१- अध्ययन व अध्यापन प्रक्रिया खेळीमेळीची होईल.

२- शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील दुरावा कमी होऊन शिक्षक-विद्यार्थी संवाद व चर्चा वाढतील.

३- घटक,पाठ हा दीर्घकाळ स्मरणात राहू शकतो.

४- विद्यार्थामधील अध्यापनाचा काळ वाढून, आत्मविश्वास वाढेल.

५- वक्तृत्व गुणांचा विकास होईल.

६- सर्व विद्यार्थांना सहभागाची संधी मिळेल.

७- विद्यार्थांच्या कलागुणांना वाव मिळून त्यांचा सक्रीय सहभाग वाढेल.

८- विद्यार्थामधील सृजनशीलता, कल्पकता या गुणांची वाढ होईल.

९- मुकबधीर विद्यार्थी देखील मोठ्या संखेने सहभागी होतील.

१०- अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी झाल्याने एकाग्रता वाढीस लागेल.

**समारोप** -

नाट्यीकरणातून अध्यापन केल्यास एकतर्फी संवाद, एकसुरीपणा थांबेल. अध्ययन व अध्यापनात शिक्षक व विद्यार्थी अंतरक्रिया आनंददायी घडून येईल.

**धन्यवाद !**

**संदर्भ**

लेखक – डॉ. मधुकर बाळकृष्ण कुंडले – अध्यापन शास्त्र आणि पद्धती – व्हीनस पुणे – ३०

लेखक – प्रा. अनंत जोशी - अध्यापन शास्त्र – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.

भरताचे नाट्यशास्त्र – *http://mr.m.wikipedia.org>wiki>* नाट्यशास्त्र.

८ वी,९ वी, १० वी – संस्कृत पुस्तक – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे.